आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० जून २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचे लोकनियुक्त प्रधानमंत्री म्हणून सर्वाधिक काळ पद भूषवणारे नेता ठरल्याबद्दल नरेंद्र मोदी यांच्यावर देशातून आणि परदेशातून अभिनंदनाचा वर्षाव

- देशात सीएनजी अर्थात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसचा तुटवडा नाही, अशी पेट्रोलियम मंत्र्यांची ग्वाही

- पश्चिम आशियातील संघर्षामध्ये अमेरिकेनं अधिक खोलवर उतरु नये, असा
- इराणचा इशारा

**आणि**

- तमिळ चित्रपट सृष्टीतले प्रसिद्ध दिग्दर्शक भारती राजा यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे भारताच्या प्रधानमंत्रीपदी सर्वाधिक काळ राहणारे नेते ठरले आहेत. मोदी यांनी प्रधानमंत्रीपदी तब्बल ४ हजार ३९९ दिवस पूर्ण केले आहेत. त्यांनी देशाचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपदी राहण्याचा विक्रम मोडला. नेहरू हे ४ हजार ३९८ दिवस देशाचे प्रधानमंत्री होते.

सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपद भूषवल्याबद्दल नरेंद्र मोदी यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह देशविदेशातल्या मान्यवरांनी अभिनंदन केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपद भूषवणं हे लोकांचा त्यांच्या नेतृत्वावर असलेल्या विश्वासाचं प्रतीक आहे, असे गौरवोद्गार **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी काढले. प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन यातल्या प्रगतीमुळे नरेंद्र मोदी यांचा कार्यकाळ वैशिष्ट्यपूर्ण ठरला, असं राष्ट्रपती म्हणाला. नरेंद्र मोदी यांनी आपल्या कार्यकाळात लोककल्याणकारी योजना राबवल्या असून विकास तळागाळापर्यंत पोहचला असं म्हणत राष्ट्रपतींनी प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं.

लोकसभेचे **सभापती** ओम बिर्ला यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात संविधानिक मूल्यं, संसदीय लोकशाही, आणि लोकशाही संस्था सक्षम झाल्या असं बिर्ला म्हणाले.

**केंद्रीय** मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीतही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, पीयूष गोयल, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान यांच्यासह इतर मंत्र्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रधानमंत्रीपदाचा सर्वाधिक काळ पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बारा वर्षाच्या काळात देशाचा स्वाभिमान परत मिळवला, सांस्कृतिक पुनरूत्थान केलं तसंच देशाला मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढलं, असं **अमित शहा** यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या कार्यकाळात देशाच्या सीमा अधिक सुरक्षित झाल्या, काश्मिरचं कलम ३७० रद्द झालं, नक्षलवादाचं उच्चाटन झालं असंही त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ या पदावर राहण्यातून लोकांचा त्यांच्यावरला विश्वास दिसून येतो असं एस. **जयशंकर** म्हणाले. तर प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाला वेग आल्याचं मंत्री **पीयूष गोयल** यांनी सांगितलं. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या, कठीण काळातही मोदींनी धैर्याने नेतृत्व केलं असं अर्थमंत्री **निर्मला सीतारामन** म्हणाल्या. प्रधानमंत्री मोदी यांनी सर्वाधिक काळ या पदावर राहण्याचा उपक्रम सुवर्ण अक्षरांनी लिहला जाईल, असं **कृषीमंत्री** शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंह, हरदिप सिंग पुरी, भुपेंद्र यादव, मनोहरलाल यांनीही नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपद भूषवल्याबद्दल **अमेरिकेतले** अनेक खासदार, उद्योजक आणि भारतीय वंशाच्या नागरिकांनी अभिनंदन केलं आहे. भारताला सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था बनवण्यात मोदींचं योगदान मोठं आहे, असं खासदार जॉन कॉर्निन यांनी म्हटलं आहे. मोदी यांच्या नेतृत्वात भारत-अमेरिका संबंध व्यापक झाल्याचं खासदार बिल हेगेर्टी यांनी सांगितलं. तर गायिका मॅरी मिलबेन, पालो आल्टो नेटवर्क्स चे सीईओ निकेश अरोडा यांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**ऑस्ट्रेलिया**चे प्रधानमंत्री स्कॉट मॉरिसन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. नरेंद्र मोदी यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा केल्या आणि देशाला जागतिक पातळीवर सक्षम केलं असं ते म्हणाले. मलेशियाचे प्रधानमंत्री **अन्वर इब्राहिम** यांनी मोदी यांचं

अभिनंदन केलं आहे. मोदी यांनी समर्पित भावनेनं लोकांची सेवा केली आणि देशाच्या विकासात भर टाकली असं ते म्हणाले. **नायजेरिया**चे अध्यक्ष बोला अहमद तिनुबु म्हणाले की भारतीय नागरिकांचा मोदींवर विश्वास असल्यानं त्यांना सलग तीनदा लोकानीं निवडून दिलं. **मालदीव**चे अध्यक्ष इब्राहिम मोहम्मद सालीह, केनियाचे अध्यक्ष समोई रुतो, श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके, पापुआ न्यू गिनीचे प्रधानमंत्री जेम्स मारपे तसंच त्रिनीदाद आणि टोबॅगो चे प्रधानमंत्री कमला परसाद बिसेसर यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

देशात सीएनजी अर्थात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसचा तुटवडा नाही असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी स्पष्ट केलं आहे. देशात घरोघरी पीएनजी अर्थात पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवला असून एलपीजी जोडण्यांना पीएनजी जोडण्यांमधे रुपांतरित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असं पुरी यांनी सांगितलं. गॅसचा कृत्रिम तुटवडा तयार करून आणि चुकीची माहिती पसरवून काही लोक परिस्थितीचा गैरफायदा घेत आहेत, अशा लोकांविरुद्ध सरकारने कारवाई केली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**- होल्ड बाईट पुरी - -**

**<><><><><>**

पश्चिम आशियातील संघर्षामध्ये अमेरिकेनं अधिक खोलवर उतरु नये असा इशारा इराणनं दिला आहे. कोणत्याही हल्ल्याला किंवा धोक्याला इराणची सशस्त्र दलं चोख प्रत्युत्तर देतील, असं इराणचे परराष्ट्रव्यवहार मंत्री अब्बास अराघची यांनी सांगितलं. परदेशी सैन्याला सुरक्षित राहायचं असेल तर त्यांनी हा प्रदेश सोडून जावं असं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, इराणने जॉर्डनमधल्या अमेरिकेच्या तळांवर आणि आखातातल्या २१ अमेरिकन आस्थापनांवर हल्ले केले आहेत. अमेरिकेनं काल होर्मुझ सामुद्रधुनीच्या आसपास हल्ले केले त्याला हे प्रत्युत्तर असल्याचं इराणच्या रिवोल्युशनरी गार्डने म्हटलं आहे.

ओमानच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या लष्करी 'अपाचे' हेलिकॉप्टर पाडल्याच्या घटनेला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन सैन्यानं इराणवर हल्ले केले. इराणच्या एका ड्रोनने हे हेलिकॉप्टर पाडलं होतं. त्यातल्या दोन्ही वैमानिकांना सुरक्षितपणे वाचवण्यात आलं.

**<><><><><>**

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने आपल्या आगामी आर्टेमिस थ्री मोहिमेसाठी चार अंतराळवीरांच्या पथकाची नावं जाहीर केली आहेत. या पथकात आंद्रे डग्लस, रुबिओ आणि रँडी ब्रेसनिक हे तीन अमेरिकन तर लुका परमिटानो हे इटालियन अंतराळवीर सहभागी होणार आहेत. ही मोहीम पुढच्या वर्षाच्या अखेरीला होणार असून यात स्पेसएक्स आणि ब्ल्यू ओरिजिन यांच्या चंद्रयानांची पृथ्वीच्या कक्षेत प्रथमच चाचणी घेतली जाईल. नासाचे अंतराळवीर बॉब हाइन्स यांना राखीव सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आलं असून ते मुख्य पथकासोबत प्रशिक्षण घेतील.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या काँग्रेसच्या राज्यसभा उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज चुकीने फेटाळल्याचा आरोप काँग्रेसने केला असून पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी आज निवडणूक आयोगाची भेट घेतली. केसी वेणुगोपाल, रणदीप सुरजेवाला, जयराम रमेश, दीपा दासमुन्शी, विवेक तनखा, अभिषेक सिंघवी यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. मीनाक्षी नटराजन यांच्या विरोधात दाखल झालेल्या खासगी तक्रारीची दखलही कोणत्याही न्यायालयाने अद्याप घेतलेली नाही, त्यांच्याविरुद्ध  कोणतंही न्यायप्रविष्ट प्रकरण नाही, निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय पक्षपाती असल्याचा आरोप करुन तो बदलण्याची मागणी त्यांनी केली. निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या निषेधात काँग्रेस नेत्यांनी काल दिल्ली आणि भोपाळमधे निवडणूक आयोगाच्या कार्यालयासमोर धरणं आंदोनल केलं.

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे.

<><><><><>

मणिपूरमध्ये विविध जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी केलेल्या शोधमोहिमेत दोन नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तर मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. काल चंदेल जिल्ह्यात आइगेजांग या भागात राबवलेल्या शोधमोहिमेत हा साठा आढळला. यात रायफल, मॅगझिन, पिस्तुल, स्फोटकं तसंच रेडिओ सेटचा समावेश आहे. इम्फाळ आणि टेंग्नॉपाल जिल्ह्यात केलेल्या कारवाईत दोन नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली.

<><><><><>

तमिळ चित्रपट सृष्टीतले प्रसिद्ध दिग्दर्शक भारती राजा यांचं आज चेन्नई इथं प्रदीर्घ आजाराने निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. ग्रामीण भागातलं नैसर्गिक सौंदर्य चित्रपटाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणं ही भारती राजा यांची खासियत होती. आपल्या कारकिर्दीत त्यांनी तमिळ चित्रपटसृष्टीत नवीन प्रवाह निर्माण करून मोठा बदल घडवून आणला. चित्रपटांच्या नायकांची चर्चा होण्याच्या काळात भारतीराजा यांच्या संपूर्ण चित्रपटाचीही तितकीच चर्चा होत होती. त्यांच्या बहुतेक चित्रपटांचं संगीत दिग्दर्शन संगीतकार इलय्याराजा यांनी केलं होतं. ते तेलगू, हिंदी आणि कन्नड चित्रपटसृष्टीतही परिचित होते. सोलवा सावन, रेड रोज, लव्हर्स, सवेरेवाली गाडी, फायनल कट हे त्यांचे हिंदीत प्रदर्शित झालेले चित्रपट. त्यांच्या नावावर सहा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, चार फिल्मफेअर पुरस्कार आणि सहा तमिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कार आहेत. २००४मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी चेन्नई इथे भारती राजा यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**//<><><><><>//**